N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): गोंदिया **P.S.**(ठाणे): गोंदिया शहर **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0053 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 08/02/2019 00:52 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 13(1)d |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 13 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरूवार **Date From** (दिनांक पासून): 07/02/2019

**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 07/02/2019

**Time From** (वेळेपासून): 14:15 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:57 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 07/02/2019 **Time** (वेळ): 23:06 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 045 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 07/02/2019 23:06 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 0.5 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तहसिल कार्यालय, गोंदिया,गोंदिया, 441601

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संजय भुवनलाल अटरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1985 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

# फिर्याद

दिनांक :— ०७/०२/२०१९

मी संजय भुवनलाल अटरे, वय ३४ वर्ष, व्यवसाय— बिल्डींग मटेरीअल सप्लायर्स, रा. मु. पारडीबांध, पो. डोंगरगाव, ता. जि. गोंदिया, मो.क्र. ९४२१७१६६५४/ ९५४५२८२२३३

मी दि. ०६.०२.२०१९ रोजी पोलीस उपअधिक्षक श्री रमाकांत दत्तात्रय कोकाटे ला.प्र.वि गोंदिया यांचे समक्ष लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

“ मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, गोंदिया येथे येवून तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर माझे परिवारासह राहतो व बिल्डींग मटेरीअल सप्लायर्सचे काम करतो. माझ्याकडे एम.एच.४०एन—६६६९ क्रमांकाचा टिप्पर असुन त्यावर श्री भाग्यवान नावाचा चालक आहे. सध्या सदर टिप्पर द्वारे पहाडी मलमा सप्लायचे काम सुरू आहे.

आज दिनांक ०६.०२.२०१९ चे दुपारी ४.०० वाजता सुमारास मी टिप्परच्या चालकासह रायपूर पहाडी, सालईटोला येथुन पहाडी मलमा भरून महावीर कन्स्ट्रक्शन कंपनी, फुलचुर गोंदिया येथे टाकण्याकरीता निघालो. अंदाजे दुपारी ४.२०—४.३० वाजता सुमारास अवंती चौक, गोंदिया येथे श्रीमती मल्लेवार, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय गोंदिया यांनी माझा टिप्पर थांबविला व मला रॉयल्टी (गौण खनिज वाहतुक परवाना) मागितली. मी माझ्याकडे असलेली मलमा वाहतुक करण्याची रॉयल्टी दिली. श्रीमती मल्लेवार मॅडम यांनी माझ्याकडे असलेली रॉयल्टी पाहुन म्हटले की, ''तुम्ही मला पाहुन रॉयल्टीमध्ये वेळ टाकलेली आहे, तुमच्यावर २,२७,५००/— रूपयाचा दंड होवु शकतो.'' मी त्यांना रॉयल्टी बरोबर असल्याचे सांगुन माझा टिप्पर सोडण्याची विनंती केली. त्यावर त्यांनी मला म्हटले की, ''तुम्हाला तुमचा दंड वाचवायचा असेल तर तुम्ही दंडातील २,००,०००/— रूपये सोडुन उरलेले २७,५००/— रूपये मला द्या, मी तुमचा टिप्पर सोडते. त्यावर मी सध्या माझ्याकडे पैसे नसल्याचे सांगताच त्यांनी मला २७,५००/— रूपये घेवुन माझ्या कार्यालयात या, असे बोलुन रॉयल्टी स्वत:कडे ठेवुन घेतली व माझा टिप्पर सोडुन दिला.

गै.अ. श्रीमती मल्लेवार, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय गोंदिया यांनी माझ्या मलमा वाहतुक करणाऱ्या टिप्परवर दंडाची कार्यवाही न करता सोडुन दिल्याचा मोबदला म्हणून माझ्याकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. २७,५००/— त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. गै.अ. श्रीमती मल्लेवार, नायब तहसिलदार यांचे विरुध्द कार्यवाही करण्याकरीता मी स्वेच्छेने तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.''

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी दोन शासकिय पंचांना पाचाराण करुन त्यांची ओळख करुन दिली. श्री कोकाटे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझा सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी स्वाक्षरी केली.

रमाकांत कोकाटे
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, गोंदिया

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पारडीबांध,पोडोंगरगांव,गोंदिया,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पारडीबांध,पोडोंगरगांव,गोंदिया,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9421716654

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजश्री राजाराम मल्लेवार | | | 1. आझाद वार्ड,स्टेशन रोड,तिरोडा, तिरोडा,तिरोडा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | तिलकचंद टिकाराम बिसेन | | | 1. रापेवाडा,पोकवलेवाडा,गोंदिया,गोंदिया, गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पंचनामा कारवाई केल्यानंतर.

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे कि, यातील घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.1 यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदाराकडे त्यांचे मलमा वाहतुक करणाऱ्या टिपरवर दंडाची कार्यावाही करण्याची भिती दाखवुन रु.27,500/-लाच रकमेची मागणी करुन आरोपी क्र.2 यांचे मार्फतीने तडजोडी अंती रु.15,000/- लाच रक्कम स्वतः स्विकारली असे फिर्यादीचे लेखी फिर्यादिवरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** MANOHAR RAMCHANDRA DABHADE(I (Inspector)) / POBN57750 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर द्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे वेळ १७.३१ वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर पिशवीत टाकुन माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्रमांक १ यांचेसह मोटार सायकलने तहसिल कार्यालय, गोंदिया येथे जाण्यास रवाना केले. तहसिल कार्यालय, गोंदिया येथे श्रीमती मल्लेवार, नायब तहसिलदार यांचे व श्री बिसेन, नायब तहसिलदार यांचेशी बोलणी दरम्यान श्रीमती मल्लेवार यांनी माझ्याकडे माझ्या मलमा वाहतुक करणाऱ्या टिप्परवर रु. २,२७,५००/– दंडाची कार्यवाही करण्याची भिती दाखवुन रू. २७,५००/– लाच रकमेची मागणी केली व त्यांचे सहकारी श्री बिसेन, नायब तहसिलदार यांचेशी सल्लामसलत करुन त्यांचे मार्फतीने तडजोडीअंती रु. १५,०००/– लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. सदर लाच रक्कम रु. १५,०००/– श्री बिसेन, नायब तहसिलदार यांनी दिनांक ०७.०२.२०१९ रोजी तहसिल कार्यालय, गोंदिया येथे सकाळी ११.०० वाजता पर्यंत आणुन देण्यास सांगीतले. या दरम्यान श्रीमती मल्लेवार यांनी मलमा वाहतुकेची रॉयल्टी (गौण खनिज वाहतुक परवाना) मला परत दिली. त्यानंतर वेळ १८.४१ वा मी ला.प्र.वि गोंदिया कार्यालयात परत आल्यावर पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण लोकसेवक श्रीमती मल्लेवार यांनी माझ्याकडे माझ्या मलमा वाहतुक करणाऱ्या टिप्परवर रु. २,२७,५००/– दंडाची कार्यवाही करण्याचे भिती दाखवुन रू. २७,५००/– लाच रकमेची मागणी करुन त्यांचे सहकारी श्री बिसेन, नायब तहसिलदार यांचेशी सल्लामसलत करुन त्यांचे मार्फतीने तडजोडीअंती रु. १५,०००/– लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरुन श्रीमती मल्लेवार, नायब तहसिलदार व श्री बिसेन, नायब तहसिलदार यांचेविरुध्द पुढील सापळा दिनांक ०७.०२.२०१९ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस उपअधिक्षक, श्री कोकाटे यांनी मला घरी जाण्यास सांगुन दिनांक ०७/०२/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वाजता ला.प्र.वि गोंदिया कार्यालयात येण्याचे सुचना दिले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सांगीतलेप्रमाणे आज दिनांक ०७/०२/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा मी ला.प्र.वि, गोंदिया कार्यालयात हजर आलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी मला लोकसेवकांनी लाचेच्या मागणी केली असुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे पंचासमक्ष सांगीतले. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्याकडुन सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. १५,०००/– (रु. ५००/– दराच्या ३० चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्येक्षिक करुन दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावली. त्याप्रमाणे सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यावर फुलपॅन्टच्या खिश्यातुन हातरुमाल काढुन चेहरा पुसुन इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास ताब्यात पकडतील असे सांगीतले.

7.2.19

7/02/19

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): MANOHAR RAMCHANDRA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN57750

स्टेशन डा.अंमलदार
पो.स्टे.गोंदिया शहर

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर ॲंथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रु १५,०००/— माझे फुलपॅन्टचे उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. त्यानंतर पंच क्र. १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर ११.२५ वा सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर पिशवीत टाकुन माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्रमांक १ यांचेसह मोटार सायकलने तहसिल कार्यालय, गोंदिया येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो—माग आले. तहसिल कार्यालय, गोंदिया येथे श्रीमती मल्लेवार, नायब तहसिलदार व श्री बिसेन, नायब तहसिलदार हे हजर न मिळाल्याने ला.प्र.वि कार्यालयात परत आलो. त्यानंतर वेळ १२.०५ वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद केला.

त्यानंतर पंच क्र. १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर वेळ १४.१५ वा सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर पिशवीत टाकुन माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्रमांक १ यांचेसह मोटार सायकलने तहसिल कार्यालय, गोंदिया येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो—माग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ तहसिल कार्यालय गोंदियाचे आत गेलो. त्याठिकाणी श्रीमती मल्लेवार, नायब तहसिलदार हे कक्षात हजर होती. त्यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी मला रु. १५,०००/— लाच मागीतली. त्यावरुन लाचेच्या रकमेस ॲंथ्रासीन पावडर लावलेल्या रु १५,०००/— नोटा माझे फुलपॅन्टचे उजव्या खिश्यातुन काढुन मी श्रीमती मल्लेवार यांना पंचासमक्ष दिले. त्यांनी लाच रक्कमरू. १५,०००/— आपले उजवे हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजून आपले समोरील टेबलवर ठेवले. त्यानंतर मी पंच क्र. १ सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे फुलपॅन्टचे खिश्यातुन हातरुमाल काढुन चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्रीमती मल्लेवार यांना रंगेहात पकडले. त्यानंतर वेळ १४.५७ वा पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करुन पुढील कार्यवाही केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक श्रीमती राजश्री राजाराम मल्लेवार, वय ४४ वर्ष, पद—नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गोंदिया व श्री तिलकचंद टिकराम बिसेन, वय ५५ वर्ष, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गोंदिया यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून श्रीमती मल्लेवार यांनी माझ्या मलमा वाहतुक करणाऱ्या टिप्परवर दंडाची कार्यवाही न करता टिप्पर सोडुन दिल्याचा मोबदला म्हणुन श्री तिलकचंद टिकराम बिसेन यांच्याशी सल्लामसलत करुन त्यांच्या मार्फतीने तडजोडीअंती रु. १५,०००/— लाच रकमेची मागणी केली. व रु. १५,०००/— लाच रक्कम श्रीमती राजश्री राजाराम मल्लेवार यांनी माझ्याकडुन स्विकारली. म्हणुन माझी त्याचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोवर व खरी आहे.

7/02/19

समक्ष

7.2.19

(रमाकांत कोकाटे)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 07/02/2019 23:15

**P.S. (**पोलीस गोंदिया शहर

**State (**राज्य**):** महाराष्ट्र

**District** गोंदिया

1. **G.D. No. (**ठाणे दैनंदिनी 047
2. **G.D. Date (**ठाणे दैनंदिनी 07/02/2019 23:15 बजे
3. **G.D. Type (**ठाणे दैनंदिनी इतर नोंद
4. **Entry for (officer) (**प्रविष्टि(अधिकार्यासाठी RameshMotiramMane
5. **Case Type (**प्रकरणाचा
6. **G.D. Brief (**ठाणे दैनंदिनी संक्षिप्त**):**
यावेळी नोंद आहे की,पोस्टे गोंदिया शहर अप.क्र.53/019 कलम 7,13(1)(ड),13(2) ला.प्र.का.सण 1988 हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला असुन सदर मुळ कायद्यात सण2018 मध्ये संशोधन झाले आहे.लाचलुचपत प्रतिबंधक संशोधन अधिनियम 2018 हा कायदा सद्या cctns प्रणालीवर अपलोड नसल्याने सदरचा गुन्हा हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला आहे.करिता कलम 7,13(1)(ड),13(2) ला.प्र.का.सण 1988 यास कलम 7(b),7 A लाचलुचपत प्रतिबंधक(संशोधन) अधिनियम 2018 असे समजण्यात यावे.
7. **Subject (**विषय**):**
नोंद.संधोधन अधिनियम सिसिटीएनएस अपलोड
8. **Acts & Sections (**अधिनियम आणि कलम**):**

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on (**अहवाल मुद्रित केलेली 08/02/2019

**Report Printed by (**द्वारे अहवाल मुद्रित केला**):**

**Name** MANOHAR RAMCHANDRA

**Rank (**पद**):** I (Inspector)

**Signature**

**Name** MANOHAR RAMCHANDRA DABHADE

**Rank (**पद**):** I (Inspector)

**No.(**क्र.**):** POBN57750

स्टेशन डा.अंमलदार
पो.स्टे.गोंदिया शहर